दिनांक :– ०१.०७.२०२२

**प्रेसनोट**

**आरोपी लोकसेवक अल्ताफ खान कलंदर खान पठाण वय ३९ वर्ष व्यवसाय नोकरी कनिष्ठ लिपीक, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय, परभणी रा. कालाबावर, परभणी.यांचे विरूध्द ४०,०००/–रू. च्या लाचेची मागणी करून ती स्विकारल्या प्रकरणी गुन्हा दाखल व अटक.**

---

दि.२९.०६.२०२२ रोजी यातील तक्रारदार यांनी अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालय, पुणे येथे तक्रार दिली होती की, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय, परभणी येथील आलोसे अल्ताफ खान कलंदर खान पठाण वय ३९ वर्ष व्यवसाय नोकरी कनिष्ठ लिपीक, रा. कालाबावर, परभणी हे तक्रारदार यांना त्यांचे ड्रायव्हिंग स्कुल चा परवाना संपला असल्याने त्यांचे नुतनीकरण करुन देण्यासाठी ४०,०००/–रू. लाचेची मागणी करीत आहे. वगैरे मजकुराची तक्रार दिली होती. त्यावरून अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांनी दोन शासकिय पंच बोलावुन दि.३०.०६.२०२२ रोजी उप प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय, परभणी येथे पंचा समक्ष तक्रारदार यांचे तक्रारीची पडताळणी करण्यांत आली. पडताळणी मध्ये यातील आलोसे यांनी तक्रारदार यांचेकडे ४०,०००/–रू. लाचेची मागणी करून ती लाचेची रक्कम स्विकारण्यास सहमती दर्शविली त्यावरून दि.३०.०६.२०२२ रोजी सापळा कारवाई दरम्यान यातील आलोसे अल्ताफ खान कलंदर खान पठाण वय ३९ वर्ष व्यवसाय नोकरी कनिष्ठ लिपीक, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय, परभणी रा. कालाबावर, परभणी यांनी सदर लाचेची रक्कम ४०,०००/–रू. उप प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय, परभणी येथे स्विकारली असुन पुढील तपास पोलीस निरीक्षक वाघमारे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, परभणी हे करत आहेत.

त्यावरून आलोसे अल्ताफ खान कलंदर खान पठाण वय ३९ वर्ष व्यवसाय नोकरी कनिष्ठ लिपीक, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय, परभणी रा. कालाबावर, परभणी यांचे विरूध्द पोलीस ठाणे नवा मोंढा, परभणी येथे गुरनं ३०४/२०२२ कलम ७ भ्रष्ट्राचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन आलोसे अल्ताफ खान कलंदर खान पठाण वय ३९ वर्ष व्यवसाय नोकरी कनिष्ठ लिपीक, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय, परभणी रा. कालाबावर, परभणी यांना अटक करण्यांत आली आहे.

सदरची यशस्वी सापळा कारवाई पोलीस अधीक्षक श्री. बनसोडे, व अपर पोलीस अधीक्षक श्री. सुरज गुरव लाप्रवि पुणे यांचे मार्गदर्शना खाली पुणे युनिट येथील श्री भारत साळुंखे, पोलीस निरीक्षक, श्री संदीप व–हाडे, पोलीस निरीक्षक, पोना/किरण चिमटे, पोशि/भुषण ठाकुर, चापोशि/पांडुरंग माळी यांनी केलेली असुन सदर गुन्हयाचा तपास श्री संदानंद वाघमारे, पोलीस निरीक्षक, लाप्रवि, परभणी हे करीत आहे.

अॅन्टी करप्शन ब्युरो, परभणी तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये कोणी अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांच्या वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील, तर कृपया अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालय, परभणी येथे संपर्क साधावा. कार्यालयीन वेळेनंतर वा सुट्टीचे दिवशी अॅन्टी करप्शन ब्युरोचे कार्यप्रणाली बाबत वा तक्रारी बाबत माहिती पाहिजे असल्यास खालील मोबाईल व दुरध्वनीवर संपर्क साधावा. तसेच तक्रारदार यांना तक्रार देण्यासाठी अॅन्टी करप्शन ब्युरो मार्फत मोबाईल अॅप www.acbmaharashtra.net हे सुरू करण्यात आले आहे.

**टोल फ्री क्र.१०६४,**

**दुरध्वनी क्र.०२४५२–२२०५९७**

**श्री किरण बिडवे, पोलीस उपअधीक्षक, परभणी ७०२०२२४६३१**